महाराष्ट्र शासन

## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in


जा.क्र.राआ/महा./आस्था/ना देय/ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र/२०२६/ २८० दिनांकः- १२/०७/२६

प्रति,

१. प्रबंधक(विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, यांचे परिक्रमा खंडपीठ, नागपूर / छत्रपती संभाजीनगर,

२. सर्व प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,

**विषय -** ना देय प्रमाणपत्र व ना विभागीय चौकशी प्रमाणपत्रासंदर्भात...

**संदर्भ -** १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण- २०२५/प्र.क्र.५७/सेवा-४, दि. १८/१२/२०२५.

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.३२/२५/कोषा-प्रशा.५, दि. २५/०७/२०२५.

### परिपत्रक

वित्त विभागाच्या संदर्भाधीन (१) येथील शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार, अंतिम वेतन प्रमाणपत्राच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात आल्यामुळे यापुढे सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याच्या संदर्भात ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र व ना देय प्रमाणपत्र स्वंतत्ररित्या मागविण्याची आवश्यकता रहाणार नाही.

तथापी, उपरोक्त परिपत्रकातील २(१) मध्ये शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांव्यतिरिक्त इतर रकमांपैकी घरबांधणी अग्रिम किंवा वाहन अग्रिम यांची वसुली वेतनातून होत असल्याने तसेच त्यासंदर्भातील आदेशाची नोंद सेवापुस्तकात असल्याने त्याची माहिती विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखास त्यांच्याच कार्यालयातून उपलब्ध होऊ शकते. तसेच २(२) मध्ये इतर अग्रिमांमध्ये उत्सव अग्रिम, संगणक अग्रिम आणि प्रवास अग्रिम यांचा समावेश असतो. ही माहितीदेखील संबंधित कार्यालयात सहज उपलब्ध होऊ शकते. असे नमूद करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने सर्व अधिनस्त कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, आपल्या कार्यालयातील कार्यरत **अधिकारी / कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये त्यांनी घेतलेल्या घरबांधणी अग्रिम, भविष्य निर्वाहनिधी ना परतावा रक्कम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम बाबतच्या नोंदी घेतलेल्या आहेत किंवा कसे त्याबाबत खातरजमा करावी, तसेच अधिकारी /कर्मचारी यांनी संबंधीत अग्रिम घेतले असल्यास व सेवापुस्तकात नोंद नसल्यास सेवापुस्तकात सर्व संबंधित नोंदी घेण्यात याव्यात.** जेणेकरुन सेवानिवृत्त होणारा अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ विहित वेळेत अदा करणे सोईचे होईल. तसेच यापुढे वरील शासन परिपत्रकातील सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

७/१/२०२६

(अजली अ. गावडे)
प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई.